१५

म. ग्रं. सं. ठाणें

विषय

चरित्र

संग्रहालय क्रमांक

२०४

लेखक भा. ब. निमकर.

सन १८५८.

पुस्तकाचें नांव रा. ब. भास्कर दामोदर पाळंदे चरित्र

१४

(चरित्र)

२-२५-१८७८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
नं. २९...

# ...र राव दामोदर पाळंदे

# ...कर राव ...मोदर पाळंदे

यांचे

# लघु चरित्र.

स्थळ प्रत

हें पुस्तक

भास्कर वल्लाळ निमकर

फर्स्ट असिस्टंट मास्तर जगंनाथ शंकर शेट इंग्लिश स्कूल यांनीं केलें

तें

पुणें येथें

"पुना सिटि प्रेस" छापखान्यांत छापिलें.

सन १८७८.

सन १८६७चा आक्ट २५ प्रमाणें पुस्तकावर हक्क ठेविला असे.

# ...र राव दामोदर पाळंदे

यांचें

# लघु चरित्र...

हें पुस्तक

भास्कर बल्लाळ निमकर

फर्स्ट असिस्टंट मास्तर ...नाथ शंकर शेट [illegible] कूल

यांनीं केलें

श्री ग्रंथ संग्रहालय ... ठाणे.

पुणें

"पुना सिटि प्रेस" छापखान्यांत छापिलें.

सन १८७८.

सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें पुस्तकावर
हक्क ठेविला असे.

किंमत ६ आणे.

# प्रस्तावना.

—००—

या आपल्या प्रिय देशांत आजपर्यंत सहस्रशः मोठमोठाले विद्वान विख्यात होऊन गेले, परंतु त्यांपैकीं कोणा एकाचें तरी चरित्र लिहून ठेविलेलें आहे असें आढळत नाहीं. नामांकित पुरुषांचीं चरित्रें लिहून ठेविल्यापासून काय लाभ प्राप्त होतात, हें या देशांतील प्राचीन काळच्या लोकांस अवगत नव्हतें; अथवा अवगत असून अशीं गद्यात्मक चरित्रें पुढील लोकांच्या उपयोगाकारितां लिहून ठेवण्याकडे त्यांनीं समजून उमजून काना डोळा केला, यापैकीं काय असेल तें असो. अशा प्रकारचीं चरित्रें लिहिलेलीं नाहींत, ही गोष्ट सिद्ध आहे. दयाळू इंग्रज सरकारचें राज्य ह्या देशांत झाल्यामुळें व त्यांच्या कृपेनें या देशांतील लोकांस विद्यामृताचा लाभ होऊं लागल्यामुळें आपल्या राज्यकर्त्या प्रभूच्या, अथवा युरोपखंडांतील इतर लोकांच्या देशांतील नामांकित पुरुषांचीं चरित्रें लिहिलेलीं आपल्या पहाण्यांत येतात. ज्याप्रमाणें युरोपखंडांत मोठमोठाले पुरुष होऊन गेले त्याप्रमाणें या आपल्या देशांतही नामांकित पुरुष होऊन गेल्याची संख्या कमी आढळेल असें नाहीं, असें असतां युरोपखंडाप्रमाणें आपल्या देशांत चरित्रें लिहिण्याचा प्रघात नाहीं यामुळें सामान्य जनांस देखील अत्यंत खेद झाल्याशिवाय राहणार नाहीं.

पाळंदे या नांवाचे कोणी उत्तम वैदिक ब्राम्हण मेणवली येथें राहत असत. दामोदरभटजीस पुण्यांत दक्षिणा असे, परंतु पेशव्यांचें राज्य नष्ट होण्यापूर्वी विद्वान् ब्राम्हणांस पुण्यांत केवळ पेशवे सरकाराकडून जी दक्षिणा मिळत असे तेवढीच द्रव्य प्राप्ति होत असे असें नाहीं, तर दरबारी व इतर पुण्यांतील श्रीमान् लोकांकडून या दक्षिणेस आलेल्या ब्राम्हणांस चांगली द्रव्य प्राप्ति होत असे. शिवाय त्यांचें आदरआतिथ्य फार चांगलें होत असे. त्याचप्रमाणें आज **फडक्यांकडे**, उद्यां रास्त्यांकडे, परवां **फडनीसांकडे** याप्रमाणें त्यांस भोजनास आमंत्रण दरसाल यावयाचें व असा क्रम प्रतिवर्षी निदान दोन तीन महिने तरी चालत असे. यामुळें अशा ब्राम्हणांस चांगली द्रव्यप्राप्ति होऊन त्यांचा व त्यांच्या कुटुंबांचा चारितार्थ सुखानें होत असे. पेशव्यांचें राज्य नष्ट झाल्यावर इंग्रज सरकाराकडून पूर्वीप्रमाणें दक्षिणा चालू आहे, परंतु दक्षिणेशिवाय त्या दक्षिणेच्या ब्राह्मणांस इतर प्राप्ति कांहीं होत नाहींशी झाली. दोन दोन महिने उत्तम भोजन मिळावयाचें तें एक दिवसही मिळण्याची मारामार पडूं लागली. दर वर्षास जी दक्षिणा मिळणार तिच्याशिवाय पूर्वीप्रमाणें इतरांकडून कांहीं प्राप्ति होत नसल्यामुळें त्या विद्वान् ब्राम्हणांस आपला आतां उदरनिर्वाह कसा होतो हा मोठी काळजी उत्पन्न झाली. जिकडे जातील तिकडे त्यांचा आदरसत्कार व्हावयाचा तोच होईनासा झाला. मग सवा सवा हात केळीची पानें व पंचपक्कान्नाचें भोजन मिळणें

दूरच राहिलें. अशी त्यांची एकंदर स्थिति झाल्यामुळें ते उदरनिर्वाहार्थ गांवोगांवीं फिरूं लागले. बिचारे काय करितात ! त्यांच्या विद्येची चहा करणारा कोणी राहिलाच नाहीं.

**दामोदरभटजी** मेणवलीकर फडनीस यांच्या आश्रयानें होते. ते जात्या उत्तम वैदिक होते तथापि तेथें त्यांचा उदरनिर्वाह चांगल्या रीतीनें होईना. यास्तव मेणवली सोडून जिकडे आपला उदरनिर्वाह होईल तिकडे जाण्याचा त्यानीं विचार केला. भिक्षुकी करून उदरनिर्वाह करावा या हेतूनें पुणें ही पेशवे सरकारची राजधानी तेव्हां जरी पेशवे तेथें नाहींत तथापि चार मोठमोठ्या लोकांचें राहाव-याचें व येण्या जाण्याचें तें ठिकाण असल्यामुळें सर्वच भिक्षुक त्या शहरीं जावयाचे. यासाठीं तेथें जाऊन आपला उदरनिर्वाह होणें कठीण. तेव्हां आतां कोठें जावें अशा विवंचनेंत ते होते इतक्यांत ह्मणजे शके १७५४ च्या भाद्र-पदमासीं त्यांची स्त्री प्रसूत होऊन त्यांस पुत्र झाला. तेव्हां **दामोदरभटजींनीं** उदरनिर्वाहार्थ बाहेर जाण्याचा केलेला बेत रहित केला. पुत्राचें जातकर्म केलें त्यांत हा पुत्र पुढें मोठा विद्वान् व कीर्तिमान होईल असें ज्योतिष्यांनीं सांगितल्यावरून त्याचें नांव **भास्कर** असें ठेविलें. मनुष्य कितीही संकटांत पडला असला तथापि त्या संकटांतून अमु-क उपायांनीं अगर अमुक मनुष्यांच्या द्वारें आपण पार पडूं असें त्यास समजलें असतां साहाजिकच तो आपलें थोडेंसें दुःख विसरतो. त्याप्रमाणें **दामोदरभटजींस** प्रापंचिक जी

ट्रेनिंग कालेजचे माजी प्रिन्सिपाल यांनीं रावबहादूर भास्कर राव दामोदर यांजविषयीं त्यांच्या लहानपणापासून माहिती कळविली याबद्दल मी त्यांचे फार आभार मानितों.

मुंबई तारीख

# राव बहादूर भास्कर दामोदर पाळंदे यांचें लघु चरित्र

## भाग १

पेशवे सरकारच्या पदरीं ज्याप्रमाणें राव, उमराव, मानकरी इत्यादि सरदार शास्त्री व वैदिक ब्राह्मण असत त्याप्रमाणें त्यांच्या मुत्सद्दी मंडळीच्या आश्रयानें शास्त्री व वैदिक आदिकरून भिक्षुक मंडळी असे. पेशवे स्वतः ब्राह्मण असल्यामुळें व त्यांजकडून पुण्यांत विद्वान् ब्राह्मणांचा मोठा आदरसत्कार होऊन त्यांच्या विद्वत्तेप्रमाणें त्यांस दक्षिणाही मिळत असे, यामुळें त्या वेळीं विद्वान ब्राह्मणांचा समुदायही फार मोठा असे. आपली दाद पेशवे सरकारापाशीं लागून त्यांजकडून आपल्यास द्रव्यप्राप्ति चांगली व्हावी या हेतूनें त्या राज्यांतील राज्यकारभार चालविणारी जी मंडळी तींतील प्रत्येकाच्या आश्रयास बरेच विद्वान् ब्राह्मण असत. **नाना फडनीस** ह्मणून पेशव्यांचा एक नामांकित, शहाणा, धूर्त, व हुशार असा कारभारी होऊन गेला. त्याच्या पदरीं विद्वान् शास्त्री व वैदिक ब्राह्मण असत. मुंबई इलाख्यांत सातारा जिल्ह्यांत वाई क्षेत्राजवळ मेणवली म्हणून गांव आहे तेथें **नाना फडनीस** यांचे वंशज राहतात, त्यांचे आश्रयानें वे० शा० सं० **दामोदरभट**

पाळंदे या नांवाचे कोणी उत्तम वैदिक ब्राम्हण मेणवली येथें राहत असत. दामोदरभटजीस पुण्यांत दक्षिणा असे, परंतु पेशव्यांचें राज्य नष्ट होण्यापूर्वी विद्वान् ब्राम्हणांस पुण्यांत केवळ पेशवे सरकाराकडून जी दक्षिणा मिळत असे तेवढीच द्रव्य प्राप्ति होत असे असें नाहीं, तर दरबारी व इतर पुण्यांतील श्रीमान् लोकांकडून या दक्षिणेस आलेल्या ब्राम्हणांस चांगली द्रव्य प्राप्ति होत असे. शिवाय त्यांचें आदरआतिथ्य फार चांगलें होत असे. त्याचप्रमाणें आज फडक्यांकडे, उद्यां रास्त्यांकडे, परवां फडनीसांकडे याप्रमाणें त्यांस भोजनास आमंत्रण दरसाल यावयाचें व असा क्रम प्रतिवर्षी निदान दोन तीन महिने तरी चालत असे. यामुळें अशा ब्राम्हणांस चांगली द्रव्यप्राप्ति होऊन त्यांचा व त्यांच्या कुटुंबांचा चरितार्थ सुखानें होत असे. पेशव्यांचें राज्य नष्ट झाल्यावर इंग्रज सरकाराकडून पूर्वीप्रमाणें दक्षिणा चालू आहे, परंतु दक्षिणेशिवाय त्या दक्षिणेच्या ब्राह्मणांस इतर प्राप्ति कांहीं होत नाहींशी झाली. दोन दोन महिनें उत्तम भोजन मिळावयाचें तें एक दिवसही मिळण्याची मारामार पडूं लागली. दर वर्षास जी दक्षिणा मिळणार तिच्याशिवाय पूर्वीप्रमाणें इतरांकडून कांहीं प्राप्ति होत नसल्यामुळें त्या विद्वान् ब्राम्हणांस आपला आतां उदरनिर्वाह कसा होतो हा मोटी काळजी उत्पन्न झाली. जिकडे जातील तिकडे त्यांचा आदरसत्कार व्हावयाचा तोच होईनासा झाला. मग सवा सवा हात केळीची पानें व पंचपक्वान्नाचें भोजन मिळणें

दूरच राहिलें. अशी त्यांची एकंदर स्थिति झाल्यामुळें ते उदरनिर्वाहार्थ गांवोगांवीं फिरूं लागले. बिचारे काय करितात ! त्यांच्या विद्येची चहा करणारा कोणी राहिलाच नाहीं.

**दामोदरभटजी** मेणवलीकर फडनीस यांच्या आश्रयानें होते. ते जात्या उत्तम वैदिक होते तथापि तेथें त्यांचा उदरनिर्वाह चांगल्या रीतीनें होईना. यास्तव मेणवली सोडून जिकडे आपला उदरनिर्वाह होईल तिकडे जाण्याचा त्यांनीं विचार केला. भिक्षुकी करून उदरनिर्वाह करावा या हेतूनें पुणें ही पेशवे सरकारची राजधानी तेंव्हां जरी पेशवे तेथें नाहींत तथापि चार मोठमोठ्या लोकांचें राहाव-याचें व येण्या जाण्याचें तें ठिकाण असल्यामुळें सर्वच भिक्षुक त्या शहरीं जावयाचे. यासाठीं तेथें जाऊन आपला उदरनिर्वाह होणें कठीण. तेंव्हां आतां कोठें जावें अशा विवंचनेंत ते होते इतक्यांत ह्मणजे शके १७५४ च्या भाद्र-पदमासीं त्यांची स्त्री प्रसूत होऊन त्यांस पुत्र झाला. तेंव्हां **दामोदरभटजींनीं** उदरनिर्वाहार्थ बाहेर जाण्याचा केलेला बेत रहित केला. पुत्राचें जातकर्म केलें त्यांत हा पुत्र पुढें मोठा विद्वान् व कीर्तिमान होईल असें ज्योतिष्यांनीं सांगितल्यावरून त्याचें नांव **भास्कर** असें ठेविलें. मनुष्य कितीही संकटांत पडला असला तथापि त्या संकटांतून अमु-क उपायांनीं अगर अमुक मनुष्यांच्या द्वारें आपण पार पडूं असें त्यास समजलें असतां साहाजिकच तो आपलें थोडेंसें दुःख विसरतो. त्याप्रमाणें **दामोदरभटजींस** प्रापंचिक जी

काळजी उत्पन्न झाली होती ती असा सुपुत्र झाल्या कारणानें अंशतः दूर झाली. पुढें सुमारें तीन वर्षे मोठ्या संकटानें मेणवलीसच त्यांचें राहणें झालें. नंतर आतां येथें राहून आपला निर्वाह नाहीं, कोठें तरी उदरनिर्वाहार्थ आपल्यास गेलें पाहिजे. असा विचार करून ते सहकुटुंब मेणवली-हून निघून फिरत फिरत मुंबई नाजिक ठाणें म्हणून एक लहानसें शहर आहे तेथें आले.

" पळस, कोकणांत असला अगर घाटावर असला त-थापि त्यास तीनच पानें " या प्राचीन म्हणीचें **दामोदर भटजींस** ठाण्यास आल्यावर स्मरण झालें. वेद विद्येचा एकं-दरीनें ऱ्हास होत चालला होता व भिक्षुकांचें तेज कमी होऊं लागलें होतें, तें स्थलांतर केल्यानें नाहींसें व्हावयाचें नाहीं अशी **दामोदरभटजींची** खात्री झाली. ठाण्यास आ-ल्यानें आपल्या इच्छेनुरूप जरी त्यांचा चरितार्थ होत न-व्हता तथापि आतां कोठें न जातां येथेंच राहून मुलगा मोठा झाला म्हणजे त्याजकडून मराठी विद्येचा व इंग्रजी वि-द्येचा अभ्यास करविण्याचा व आपण व आपल्या वडिलांनीं ज्या वेद विद्येचा आश्रय केला होता तिचा अभ्यास त्याज-कडून फारसा न करविण्याचा विचार त्यांनीं केला. हिं-दूंस व विशेषें करून भिक्षुकांस हिंदु धर्माचा अभिमान फा-रच असावा हें यथायोग्य, व त्याप्रमाणें **दामोदरभटजींसही** होता, परंतु सांप्रत देशकाल वर्तमानाकडे लक्ष न देतां मुलास वैदिक किंवा शास्त्री करण्याचा विचार केल्यानें आ-

पली स्थिति कांहीं बरी परंतु दिवसानुदिवस ह्या ज्या दोन-विद्या त्याविषयीं लोकांची अभिरुचि कमी कमी होत चालली आहे यामुळें आपल्या मुलास फार दुःखानें दिवस काढावे लागतील ते न लागावे ह्मणून त्यांनीं वरील विचार कायम केला. पुढें कांहीं दिवस लोटले नाहींत तोंच त्यांच्या स्त्रिचा वाखा होऊन ती मृत्यू पावली. यामुळें **भटजी** मोठ्या संकटांत पडले. मुलगा लहान, तीन किंवा चार वर्षांचा, अशा लहान बालकास माता जवळ नसणें ही केवढी दुःखाची गोष्ट बरें! तशांत गरिबीमुळें पुनरपि लग्न होणेंहि कठीण. लहान बालकाची शुश्रूषा करण्यास दासदासी ठेवण्याचें सामर्थ्य नाहीं. अशा संकटांतच **भटजींनीं** कांहीं दिवस काढले. त्यांचा पुत्र **भास्कर** जसजसा वयानें मोठा होत चालला तसतशी त्याची हुशारीही दिसूं लागली. नंतर **भटजींनीं भास्करास** मराठी शाळेंत घातला. व मोठ्या प्रयासानें आपलें द्वितीय लग्नही केलें. **भास्कर** लहानपणापासून प्रकृतीनें अशक्त, तशांत त्यास माता नव्हती यामुळें **भटजी** आपल्या या एकुलत्या एक मुलावर अति ममता करीत असत. मुलानें विद्याभ्यास करावा अशी जरी मनापासून त्यांची इच्छा होती तरी त्याच्या स्थितीकडे पाहून त्यांस दुःख होत असे. यामुळें मुलावर विद्येविषयीं ते फारशी सक्ती करीत नसत. परंतु **भास्कर** हा वयानें लहान होता तथापि विद्याभ्यासाकडे त्याचें इतकें लक्ष असे कीं, त्या अल्पवयांतही वेळच्या वेळीं शाळेंत जाऊन व नेमलेला

धडा पाठ करून शाळेतील इतर मुलांबरोबर कज्जाकफावत कधींही तो करीत नसे. यामुळें त्यानें आपल्या गुरुजींस कधींही असंतोषित केलें नाहीं. यावरून भास्कर हा पुढें फार चांगला विद्वान् होईल अशीं सुचिन्हें पूर्वींच दिसून आलीं. त्यावेळीं इंग्लिशांचें ह्या प्रांतीं राज्य होऊन फार थोडीं वर्षें झालीं होतीं व इंग्रजी विद्येचा अभ्यास ज्यानीं केला त्यांस मोठमोठाल्या चाकऱ्या मिळत असत. आपली गरिबी दूर होण्यास मुलानें इंग्लिश भाषेचा अभ्यास करणें ह्याशिवाय अन्य मार्ग नाहीं असें जें भटजींस फार दिवस वाटत होतें त्याप्रमाणें अनुभव घेण्याचा विचार करून भास्करानें धुळाक्षराचा अभ्यास पुरा केल्यावर याचे पुढील मराठी अभ्यास त्वरित होतील अशी तजवीज त्यांनीं केली. ज्या सरकारी मराठी शाळेमध्यें हा मुलगा अभ्यास करीत होता त्यांतील ज्या ज्या उपगुरूंच्या व गुरूंच्या हाताखालीं हा होता त्या त्या उपगुरूंचा व गुरूंचा याजविषयीं उत्तम अभिप्राय असे. विद्यार्थ्यांस शिकण्याची हौस असेल तर गुरुसही दुप्पट मेहनत घेऊन शिकविण्याची हौस येते. प्रकृति जरी सदृढ नव्हती व आपल्यास जें पाहिजे तें, आपण श्रीमान् नसल्यामुळें मिळण्याची जरी सोय नव्हती तथापि पाहिजे ती खटपट करून आपण ज्या शाळेंत आहों त्यांतील सर्व अभ्यास पुरा करून इंग्रजी विद्येचा अभ्यास होईल तितका केल्याशिवाय रहावयाचें नाहीं असा वडीलांप्रमाणें भास्करानेंही निश्चय केला. अशी ह्या विद्यार्थ्यास शिक-

ण्याची फार हौस असल्यामुळें त्याच्या गुरूंस फार समाधान होत असे व ते मोठ्या काळजीनें त्यास शिकवीत असत.

साधारणपणें पाहतां लहान मुलांचें लक्ष खेळावर फार असतें. शाळेंत अभ्यासाकडे लक्ष नसणें, गुरुजी जें शिकवीत असतील अगर जो बोध करीत असतील तिकडे लक्ष न देतां इतर मुलांबरोबर इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत बसणें, याबद्दल गुरूनें शिक्षा केली तथापि आपला क्रम न सोडणें, शाळेंत येतांना अगर शाळा सुटल्यावर घरीं परत जातांना रस्त्यांत मस्ती करणें, ओरडणें अगर धांवत जाणें, नेमून दिलेला धडा घरीं तयार न करणें किंवा सुट्टीच्या दिवशीं प्रातःकाळापासून सूर्यास्तापर्यंत खेळण्यांत वेळ घालविणें, खोटें बोलणें, लबाडी करणें इत्यादि सर्व किंवा त्यापैकीं कांहींतरी दुर्गुण लहानपणीं बहुतेक मुलां-मध्यें आढळत नाहींत असें घडत नाहीं, परंतु ज्यांच्या च-रित्राचें वर्णन आपण करीत आहों असे जे आपले प्रख्यात विद्वान् रावबहादूर भास्करराव दामोदर पाळंदे ते लहान असतां त्यांचा प्रकार साधारण बहुतेक मुलांपेक्षां अगदीं भिन्न असे. शाळेंत जातांना अथवा शाळेंतून घरीं परत येतांना-ते वाटेनें धिंगामस्ती करीत नसत. गुरुजी जो धडा शिकवीत असतील अथवा जो सदुपदेश करीत असतील तिकडे पूर्ण लक्ष ठेवून वर्गांतील इतर मुलांची खोडी न क-रितां अगर कोणाशीं कज्याकफावत न करितां ते आप-ल्या आभ्यासांत निमग्न असत. खोटें बोलणें किंवा लबाडी

करणें याची तर त्यांस लहानपणापासून मोठी चीड असे. शाळेंत अथवा घरीं त्यांस जो रिकामा वेळ मिळे तो तें व्यर्थ इकडे तिकडे फिरणें किंवा खेळणें अथवा इकडच्या तिकडच्या गप्पा मारणें यामध्यें न घालवितां आपला धडा पाठकरण्यामध्यें अथवा सुज्ञ विद्यार्थ्यांबरोबर विद्येविषयीं गोष्टी बोलण्यांत घालवीत असत. सारांश लहानपणापासूनच दुर्वर्तनाकडे त्यांचा किंचितूही कल नव्हता, यामुळें त्यांच्या गुरूंची त्यांजवर अत्यंत ममता असे. त्यांची अभ्यासांत हुशारी, त्यांचा सुस्वभाव व त्यांचें सद्वर्तन यांहीं करून ज्यांच्या ज्यांच्या पाहण्यांत ते येत ते ते त्यांची वाखणणी केल्याशिवाय राहत नसत. अशी लहानपणापासून भास्कररावांची वाहवा होऊं लागली यामुळें त्यांच्या गुरूजींस केवढें भूषण वाटत असे व त्यांच्या वडिलांस किती समाधान वाटत असे याची वाचकांनींच कल्पना करावी.

---

## भाग २.

सांप्रत प्रत्येक सरकारी मराठी शाळेंत जसा नियमित अभ्यास होऊन विद्यार्थ्यांचा मोठमोठाल्या विषयांचा अभ्यास इंग्रजी शाळेंत पुरा होतो तसा प्रकार पूर्वीं नसे. त्या वेळीं मराठी शाळेंत भूगोल, खगोल, पदार्थविज्ञान, थोडें बहुत रसायनशास्त्र, हे विषय व त्याचप्रमाणें सिद्धांत, बीजगणित, क्षेत्रफळ, घनफळ, शून्यलब्धि, त्रिकोणमिति इत्यादि विषय

शिकवीत असत. यामुळें अशा विषयांचा अभ्यास करून जो कोणी इंग्रजी विद्येचा अभ्यास करण्यास सुरवात करी त्यास ती विद्या शिकण्यास मोठें साह्य होत असे. भास्कर-रराव यानीं मराठी भाषेचा अभ्यास मराठी शाळेंत बराच केल्यावर त्यांच्या वडीलांनीं त्यांस ठाण्यांतील इंग्रजी शाळेंत इंग्रजी भाषेचा अभ्यास करण्याकरितां घातलें. वेदविद्या नाहीं तर नाहीं, परंतु संस्कृत भाषेचा अभ्यास केला असतां त्यापासून पुष्कळ लाभ होतील असें जाणून भास्कररावजीनीं या भाषेचा अभ्यास करावा या हेतूनें एक चांगला शास्त्री पाहून त्याजपाशीं त्यांनीं नित्य शिकावयास जावें अशी त्यांच्या वडिलांनीं तजवीज केली. याप्रमाणें इंग्रजी व संस्कृत या भाषांचा अभ्यास करीत असतां त्यांस अनेक प्रकारचीं संकटें उत्पन्न होत असत. त्यांची प्रकृति अशक्त असल्यामुळें कधीं ताप, कधीं पडसें, कधीं खोकला, या विकृतींची त्यांस बहुत करून सदोदित बाधा असे, असें ह्मटल्यास चिंता नाहीं. गरिबीमुळें अभ्यासास सर्व प्रकारचीं पुस्तकें घेण्याचें सामर्थ्य नव्हतें. त्याचप्रमाणें इतर श्रीमानांचे मुलांस शाळेशिवाय शिकण्यास शिक्षकांची योजना असते तशीही त्यास नव्हती. सारांश कोणत्याही भाषेचा अभ्यास करण्यास व त्यांत परकीय अशी जी इंग्रजी भाषा तिचा अभ्यास करण्यास अगदीं जरूर अशा साधनांची अवश्यकता लागते त्या सर्वांचा भास्कररावजींस अभाव असे. परंतु सर्वोपरी त्यांची अशी जरी स्थिति होती तरी त्यांनीं आपला अभ्यास

होईल तितका पुरा करण्याचा दृढ निश्चय केला.

त्यावेळीं इंग्लिश भाषेचा अभ्यास करणारे फार थोडे असत व ज्या सरकारी व सावकारी कचेऱ्यांमध्यें काम इंग्रजी भाषेंत चालत असे त्यांत थोडेंसें इंग्रजी येत असून इंग्लिश अक्षर चांगलें लिहितां येत असल्यास बऱ्याच चांगल्या पगाराची जागा मिळत असे. असा प्रकार असल्यामुळें पुष्कळ गरीब कुटुंबें सुखांत पडल्याचीं उदाहरणें भास्कररावजींचे पाहण्यांत येत असतां व आपल्या कुटुंबाची गरिबी त्वरित दूर होण्यास लवकर चाकरी पतकरणें हा सुलभ उपाय असतां तो स्वीकारण्याचें त्यांचे मनांत येईना. आपल्यापाशीं जीं पुस्तकें नाहींत त्यांतील विषय तयार करण्याकरितां तीं पुस्तकें ज्यांजपाशीं असतील त्यांजकडे जाऊन ते विषय तयार करणें; आपल्यास जें समजत नसेल त्याची समजूत करून घेण्यास ज्यास तें येत असेल त्याजकडे जाऊन त्याची समजूत करून घेणें व नेहमीं उत्तम रीतीनें धडे तयार करून आपल्यास ज्ञान प्राप्त करून घेण्यास जें जें करावें लागेल तें तें करणें यांत त्यांस फार समाधान वाटत असे.

मराठी शाळेंत असतां ज्याप्रमाणें त्यांचें वर्तन असे त्याचप्रमाणें इंग्रजी शाळेंतही असे, यामुळें त्यांतील गुरु व उपगुरु ह्यांस भास्करराव फार आवडते झाले. इंग्रजी शाळेची ज्या ज्या वेळीं परीक्षा होत असे त्या त्या वेळीं उत्तम मुलांपैकीं भास्करराव हे एक असत. इंग्रजी शिकत असतां मराठी भाषेकडे त्यांचें दुर्लक्ष नसे. हल्लीं ज्याप्रमाणें इंग्लिश

अधिक चांगलें ज्ञान करून घेण्यास कॉलेजांत जाऊन तेथें काहीं दिवस अभ्यास करावा लागतो व कालेजांत जाण्यास ज्याप्रमाणे युनिव्हर्सिटीची ( पाठशाळेची ) म्याट्रिक्युलेशन नामक प्रवेशपरीक्षा द्यावी लागते त्याचप्रमाणें पूर्वीही कॉलेजांत जाणें लागत असे व त्याकरितां स्कॉलरशिपची म्हणजे पगारी विद्यार्थ्यांची परीक्षा द्यावी लागत असे. ही स्कॉलरशिपची परीक्षा प्रतिवर्षी प्रत्येक इंग्रजी शाळेत होत असे. ही परीक्षा देऊन आपण कॉलेजांत केव्हां जाऊं अशी उत्कंठा **भास्कररावजींस** झाली. ठाण्याच्या शाळेतील अभ्यास पुरा होऊन स्कॉलरशिपच्या परीक्षेची वेळ जेव्हां जवळ आली तेव्हां पूर्वीपेक्षां दुप्पट मेहनत घेऊन त्या परीक्षेस अवश्य अशा सर्व विषयांची **भास्कररावजींनीं** उत्तम तयारी केली.

**भास्कररावजींची** स्कॉलरशिपची परीक्षा उतरल्याचें सुवर्तमान त्यांचे वाडिलांस जेव्हां कळलें तेव्हां त्यांस परमानंद झाला. **भास्कररावजींस** विद्येचें केवळ व्यसन लागून गेलें होतें असें ह्मणण्यास चिंता नाहीं. स्कॉलरशिपची परीक्षा देऊन **भास्कररावजी** हे सन १८४७ त मुंबईस एलफिन्स्टन् नामक विद्यालयांत अभ्यास करावयास गेले. आपल्या घरची एकंदरीत गरिबी वारंवार मनांत येऊन **भास्कर** रावजींस वाईट वाटे. व कित्येक वेळां असें ही त्यांस वाटे कीं आपल्या योग्यतेनुरूप जी चाकरी मिळेल ती पत-

करून कुटुंबास सुख प्राप्त होईल अशी तजवीज करावी. परंतु त्यांस वाटे कीं मी एकवार चाकरी पतकारिली ह्मणजे मग मला विद्याभ्यास करावयास अवकाश सांपडला तथापि प्रपंचाच्या काळजीनें आपल्या हातून व्हावा तसा विद्याभ्यास होणार नाहीं. यास्तव कसेंही होवो परंतु तूर्त चाकरी मिळविण्या कडे लक्ष द्यावयाचें नाहीं. असा कृत निश्चय पुनः एकवार करून त्यांनीं कॉलेजांतील अभ्यास सुरू केला. इंग्रजी शाळेंत ज्या पुस्तकांची अभ्यास करण्यास गरज लागते त्यां पेक्षां कॉलेजांत निराळीं व फार किंमतवान् अशा पुस्तकांची गरज लागते. **भास्करराव** हे स्वसामर्थ्या प्रमाणें अशा प्रकारच्या पुस्तकांतून कांहीं कांहीं विकत घेत असत. परंतु जीं त्यांच्यानें घेववत नसत त्यांतील विषयांचा अभ्यास तीं ज्यांजपाशीं असत त्यांजकडे जाऊन ते करीत असत. या प्रमाणें कालेजांत त्यांचा अभ्यास चालला असतां त्यांचा सुस्वभाव, नम्रता, सहन शीलता, मन मिळाऊ पणा, निराभिमान, आपल्यास जें येतें तें समजवून देण्या विषयीं दुसऱ्यानें विच्यारिलें असतां मोठ्या हौसेनें त्याची समजूत घालून देणें, असत्याचा तिरस्कार व सत्यावर प्रीति करणें इत्यादि त्यांच्या लोकोत्तर गुणांनीं कॉलेजांतील सर्व विद्यार्थ्यांशीं त्यांचें सख्य असे. प्रकृती जरी अशक्त होती तरी शक्तीच्या पलीकडे मेहनत करून आपला अभ्यास इतका उत्तम रीतीनें **भास्करराव** करीत असत कीं त्या वेळीं त्या विद्यालयांत उत्तम असे जे विद्यार्थी होते त्यांत त्यांची

गणना होत असे; व याचमुळें कालेजांतील त्यांचे इंग्लिश व एतद्देशीय गुरूंचे ते फार आवडते झाले. कालेजांत असतांना तेथें ज्या अनेक परीक्षा होत असत त्या सर्वांमध्यें हे कधीं नापास झाल्याचें ऐकिवांत नाहीं. ज्या ज्या परीक्षेची ते तयारी करीत ती ती त्यांची परीक्षा उतरत असे. यामुळें **भास्करराव** हे पुढें मोठे नामांकित विद्वान् होतील असें जें पूर्वी भविष्य केलें होतें तें बहुतांशीं खरें होत चाललें आणि अशा विषयीं त्यांच्या वडिलांपाशीं कोणी गोष्टी काढिल्या म्हणजे त्यांस किती आनंद होत असे याची वाचकांनीच कल्पना करावी.

संस्कृताचा व मराठी भाषेचा अभ्यास त्यांचा हळुहळु सुरू होताच ह्यामुळें कोठें सभा असली अथवा मराठी भाषेंत कोणी व्याख्यान देणार असला तर भास्करराव तेथें नाहींत असें व्हावयाचें नाहीं. सभेमध्यें ज्या विषयाचा वादविवाद अथवा विचार चालला असेल त्या विषयावर आपलें जें मत असेल तें ते स्पष्टपणें बोलून दाखवीत असत. **भास्कररावजींची** प्रकृति लहानपणा पासून अशक्त असे हें अनेक वेळां सांगितलेंच आहे. परंतु ती जास्त बिघडण्यास त्यांची अप्रतिम अभ्यास करण्याविषयीं मेहनतही फार कारणीभूत झाली. ते मराठी व इंग्रजी शाळेंत असतां साधारण मेहेनत घेऊन इतर विद्यार्थ्यांप्रमाणें किंबहुना कित्येकांपेक्षां अधिक चांगल्या रीतीनें जरी त्यांचे धडे होत

असत तथापि तेवढ्यानें त्यांची तृप्ती होत नसे. दिवसास एकक्षणही रिकामा न घालवितां रात्रीं दहा अगर अकरा वाजेपर्यंत ते अभ्यास करीत असत. हें त्यांच्या अशक्त प्रकृतीस मानणार नाहीं असें जाणून त्यांचे वडील असें अति जागरण न करण्याविषयीं त्यांस वारंवार बोध करीत असत. परंतु वडिलांची नजर चुकवून त्यांचा फार रात्र होईपर्यंत अभ्यास करित बसण्याचा क्रम सुरू असे. यामुळें कित्येक वेळां त्यांचे वडील त्यांस रागेंही भरत असत. असा प्रकार ते इंग्रजी शाळेंत होते तेव्हांपासूनच सुरू होता. कालेजांत अति मेहनत घेऊन अभ्यास केल्याशिवाय आपला अभ्यास चांगला होणार नाहीं असें समजून कालेजांत गेल्यापासून ते अशी मेहनत घेऊं लागले कीं, ती पाहून त्यांचे गुरु व मित्र यांस आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नसे. सर्व दिवस अभ्यास करण्यामध्येंच जात असे. परंतु रात्रीं दहा अकरा वाजेपर्यंत ते अभ्यास करीत असत. असाच क्रम ते कायम ठेविते तर त्यांची प्रकृति अतिशय बिघडली नसती. कालेजांत ज्या अर्धपाक्षिक, मासिक, त्रैमासिक, षण्मासिक, वार्षिक व दुसऱ्या अनेक परीक्षा होत असत त्या सुरू होण्याचा समय नजिक आला म्हणजे **भास्करराव जी** हे कित्येक वेळां अहोरात्रही अभ्यास करीत असत. अशा वर्तनानें तुमची प्रकृति एकदा अनिवार बिघडली ह्मणजे औषधी उपायही चालावयाचे नाहींत असें त्यांचे मित्र त्यांस

वारंवार सांगत असत, परंतु अशा शुभचिंतकांचे कोणत्या तरी रीतीनें समाधान करून अति मेहनत घेउन अभ्यास करण्याचा आपला क्रम त्यांणीं तसाच चालविला.

**भास्करराव** कॉलेजास रजा मिळाली होती, अशा वेळीं एकदां आपले वडील, सापत्न माता, व कुटुंबांतील इतर मनुष्यें यांस भेटावयास आले होते. त्यावेळीं आपले वडील किती प्रयासानें आपला गरिबीचा प्रपंच चालवीत असत, त्यांत त्यांस जी संकटें उत्पन्न होत असत त्यांचें निवारण ते कसें करीत असत वगैरे सर्व गोष्टींचे ज्ञान त्यांस त्या अल्प काळांतही बरेंच प्रकारचें झालें. आपले वडील आतां वृद्ध होत चालले यासाठीं त्यांची प्रपंचसंबंधीं काळजी दूर होऊन त्यांच्या वृद्धापकाळांत तरी त्यांस सुख मिळेल असें करावें असें **भास्कररावजींचें** मनांत आलें. रजा संपण्याचा काळ समीप आला व **भास्करराव** एक दोन दिवसांत मुंबईस निघून जाणार अशा संधीस **दामोदरभटजींनीं भास्कररावांस** एकीकडे नेऊन त्यांस पुढें लिहिल्याप्रमाणें ते बोलले.

" बा, **भास्करा,** तुझा जन्मही झाला नव्हता तेव्हांपासून मी गरीबीमध्यें कसे दिवस काढिले असतील ते माझे मलाच माहीत. मेणवलीस आपला चांगल्या रीतीनें उदरनिर्वाह चालेना ह्मणून येथें आलों. येथें येऊन फार दिवस झाले नाहींत तों तुझी माता स्वर्गस्थ झाली. तूं लहान व अशक्त

न माझी तुजवर अत्यंत प्रीति यासाठीं तुझे जेवणा खाण्याचे हाल होऊं नयेत व आपला गरीबीचा प्रपंच चांगल्या रीतीनें चालावा ह्मणून मी आपलें दुसरें लग्न केलें. मजकडून होईल तो प्रयत्न करून तुझ्या विद्याभ्यासांत कोणत्याही प्रकारची अडचण येऊंनये अशी तजवीज मीं ठेविली. मला काय तो तूंच एक पुत्र. तूं विद्वान होऊन तुझी प्रशंसा सर्व लोकांत व्हावी व तूं आपला प्रपंच सुखानें करावा याशिवाय मला कांहीं अपेक्षा राहिली नाहीं. गरिबीच्या विचाराप्रमाणें तुझें मीं लग्न करून दिलें आहे. माझ्या प्रपंचाची तुला बिलकूल काळजी नको. कसा तरी बऱ्या वाईट रीतीनें मी आपला प्रपंच चालवीन परंतु तूं प्रकृतीनें फारच अशक्त आहेस एक वर्षाच्या ठिकाणीं दोन वर्षें लागलीं तरी लागोत, परंतु प्रकृतीस इजा होईल अशी शक्तीच्या पलीकडे मेहनत न करितां उत्तम विद्या संपादन कर. हे माझे हेतू तूं शेवटास नेलेस ह्मणजे माझें सार्थक्य झालें असें मी समजेन." लहानपणापासून ज्यांनीं आपला काल विद्या संपादनार्थ घालविला व विद्या संपादन करणें या शिवाय मनुष्यास अन्य भूषण नाहीं असें ज्यांस वाटत असे, व कसाही प्रसंग आला असतां विद्येचा नाद सोडणे नाहीं असा ज्यांचा कृतसंकल्प होता अशा आपल्या **भास्कररावास** त्यांच्या वडिलांनीं केलेला जो सदुपदेश तो ऐकून अत्यानंद झाल्यावांचून राहिला

असेल अशी कल्पनाही करणें अयोग्य. त्या वेळीं काले जांत जितका अभ्यास होत असे तितका बहुतेक त्यांचा अभ्यास झाला होता. त्यांनीं त्या विद्यालयांत जी शेवटची परीक्षा दिली ती समीप आली तेव्हां त्यांच्या मनांत असे विचार येऊं लागले कीं, शाळेंत व कालेजांत मिळून एकंदर आजपर्यंत आपण बऱ्याच परीक्षा दिल्या. परंतु आतां आपल्यास जी परीक्षा देणें आहे त्या परीक्षेत आपण लायक न ठरलों तर आजपर्यंत आपण केलेला अभ्यास व्यर्थ होईल. अभ्यास न करितां अन्य कामांत मी आपला वेळ घालवितों असें आपल्या वाडिलांस खास वाटेल. आपल्या बरोबरीचे लायक ठरून आपण नालायक ठरलों असतां आपल्यास खालीं पाहावें लागेल. जे लायक ठरतील त्यांस भराभर चाकऱ्या मिळून ते आपला काळ सुखानें घालवूं लागतील, व आपणास येथेंच राहावें लागेल. आपल्या घरीं तर वडील वृद्ध ह्मणून कुटुंबाचा निर्वाह करणें आपल्यावर अल्प काळांत येणार. आपले वडील किती संकटानें उदरनिर्वाह करीत आहेत. लहानपणापासून किती दुःखानें व संकटानें आपलें आयुष्य गेलें. कदाचित् जेवढी विद्या संपादन झाली आहे तिच्या योगानें उदरनिर्वाहापुरती चाकरी मिळेल. परंतु आजपर्यंत विद्या संपादन करावयाचा केलेला निश्चय सफल होण्याचा काळ समीप आला असतां साफल्यता न झाली तर केवढी दुःखाची गोष्ट समजली

पाहिजे ! अल्प स्वल्प विद्या शिकून मी कोठें तरी चाकरी मिळवावी हें मला योग्य नाहीं असा वडिलांचा हेतु आरंभापासून होता. आपली परीक्षा न उतरल्यामुळें आपल्या वृद्ध वडिलांस किती दुःख वाटणार आहे ! आपण आजपर्यंत विद्याभ्यासाशिवाय अन्य कामांत आपला वेळ घालविला नाहीं असें जरी आपल्यास वाटतें तथापि, ही एक आपली परीक्षा न उतरल्या व्यर्थ वेळ घालविल्या सारखेंच होणार. यासाठीं आपली प्रकृति जरी अशक्त आहे व नेहमी कांहीं तरी शरीरांत विकृति मुळें असतेच तरी जी मेहनत आजपर्यंत आपण घेत होतों तिजपेक्षां आपल्यास फारच ज्यास्त मेहनत घेतली पाहिजे. अभ्यास करण्यामध्यें आति मेहनत करणें हें आपल्या शरीर प्रकृतीस अहितकारक आहे व तसें न करण्याविषयीं जरी आपले वडील व इष्टमित्र आपणास वारंवार बोध करीत आहेत तथापि ज्या अर्थी त्यांच्या इच्छेनुरूप वागल्यानें कदाचित् सर्वस्वी आपली मानहानी व नाश होण्याचा काल समिप आला आहे त्या अर्थी काहीं होवो परंतु आति मेहनत करून जवळ आलेली परीक्षा उतरेल अशी तजवीज आपल्यास केलीच पाहिजे. असें त्यांच्या मनांत येऊन ठाण्याहून परत मुंबईस उष्णकाळची रजा पुरी होतांच ते येऊन कालेज सुरू झाल्या दिवसापासून अशा प्रकारची मेहनत घेऊं लागले कीं, तशी मेहनत घेऊन अभ्यास करणारा शरीर

प्रकृतीनें सुदृढ जरी असता तरी त्यासही या योगें विकृती झाल्यावांचून राहतीना; मग आपले भास्करराव तर जन्मापासूनच प्रकृतीनें अशक्त; तशांत घरची मुळापासून गरिबी व त्यांस विद्याभ्यासाची लहानपणापासून अति गोडी, यामुळें ते जी मेहनत घेत होते तिच्या योगानें त्यांची प्रकृति कशी क्षीण झाली असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. एकंदर चोवीस तासांतून सरासरीनें दोहोंपेक्षां ज्यास्त तास त्यांनीं बहुतकरून कधींच [illegible] नाहीं. सकाळीं, सायंकाळीं आणि शिवाय पहांटेस, पाहावें तेव्हां ते अभ्यास करीत आहेत असेंच दृष्टीस पडे. अशा रीतीनें परीक्षेचा काळ येईपर्यंत त्यांचा अभ्यास सुरू होता. नंतर पूर्वी ठरविलेल्या नियमाप्रमाणें परीक्षा सुरू झाली व त्यांत भास्करराव यांची परीक्षा उतरली इतकेंच नाहीं परंतु हे त्यावेळीं उतरलेल्या विद्यार्थ्यांपैकीं मोठे हुशार अशी परीक्षकांनीं त्यांची तारीफ केली हे सुवर्तमान ऐकून त्यांचे तीर्थरूपांस जो परमानंद झाला त्याचें वर्णनही करणें अशक्य.

---

## भाग ३.

ज्या मनुष्यास विद्यामृत प्राशनाची अभिरुचि एकवेळ लागली त्यास ज्ञान प्राप्तीशिवाय अन्य उद्योग करून चैन पडावयाचें नाहीं. इच्छित हेतु सिद्धीस गेला ह्मणजे आप-

ण धन्य असें बहुतेकांस वाटतें, व त्याप्रमाणें आपल्या **भास्कररावजींस** यांचा त्या वेळीं जितका अभ्यास व्हावयाचा तितका झाला असल्यामुळें तसें वाटण्याचा संभव खरा; परंतु लहानपणापासून ज्यांस विद्याभ्यासाची गोडी असून त्या वेळीं चाकरी मिळविण्यास फारसा विद्याभ्यास करावा लागत नसतां व घरची गरिबी असतां ज्यांणीं विद्याभ्यास सोडून चाकरी मिळविण्याचा प्रयत्नही केला नाहीं, ज्यांची प्रकृति अशक्त, व ज्यांस असावें तितकें साहाय्य नसल्यामुळें अभ्यास करण्यास शतशः अडचणी आल्या तथापि विद्याभ्यासाचा क्रम सोडावा असें क्षणभरही वाटलें नाहीं; अशा आपल्या प्रसिद्ध व परोपकारी **भास्कररावजींस** आपली परीक्षा उतरल्यामुळें आपण मोठे विद्वान झालों अगर या उपर आपल्यास विद्याभ्यास करावयास नको असें कांहींएक वाटलें नाहीं. उलटें त्यांस वाटे कीं, आजपर्यंत आपण जो काय विद्याभ्यास केला तो नाना प्रकारच्या दुर्धर अडचणीमुळें व्हावा तसा झाला नाहीं; आजपर्यंत मोठमोठाले विद्वान आपल्या व अन्य देशांत होऊन गेले त्यांणीं जे उत्कृष्ट ग्रंथ लिहून ठेविले आहेत ते आपण एकवारही वाचले नाहींत, व कोणत्याही भाषेंतील कांहीं ग्रंथांचा थोडा अभ्यास केल्यानें अगर निरानिराळ्या विषयांचा ह्मणजे गणित, संस्कृत, मराठी, खगोलविद्या, पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र इत्यादिकांचा थोडा थोडा अभ्यास केल्यानें ते ग्रंथ अथवा

ते विषय आपणास पूर्णपणें अवगत आहेत असें समजणें चूक होय. आपण असेच जर आणखी ३-४ वर्षे विद्यालयांत राहिलों तर हल्लींपेक्षां वरील विषयांत मेहनत घेतली तर आपली थोडी तरी ज्यास्त प्रविणता होईल. परंतु आपल्या घरची स्थिति कशी आहे तिकडे जरा लक्ष दिलें ह्मणजे मनास अत्यंत दुःख होतें व आपल्याच हेतुप्रमाणें चालण्याचा निश्चय केल्यास पुढें काय काय संकटें उत्पन्न होतील ह्यांचा नियम नाहीं. यासाठीं आतां येथेंच राहून ज्यास्त विद्याभ्यास करण्याचा हेतु रहित करून कोठें तरी चाकरी पत्करावी. नंतर जो अवकाश मिळेल त्यांत साधेल तो विद्याभ्यास करावा हें बरें असा त्यांणीं विचार केला. हा त्यांचा हेतु लवकरच सिद्धीस गेला. मुंबईतील काळेजांतील नामांकित विद्यार्थ्यांपैकीं हे असल्यामुळें त्यांतील सर्व गुरु व त्यांच्या योगानें त्यांचे वरिष्ठ यांची त्यांजवर कृपा असे यामुळें आपण कोठें तरी चाकरी करण्यास इच्छितों असें त्यांस कळविल्यामुळें त्यांच्या विद्वत्तेस योग्य अशी एखादी जागा रिकामी होतांच ती भास्कररावजींस प्रथम देण्याचा आपला इरादा आहे असें त्यांनीं कळविलें. सन १८५० त भास्कररावजींची कॉलेजांतील परीक्षा उतरून त्यांस दरमहा शंभर रुपये पगारावर श्री० आपासाहेब जमखिंडीकरांचे शिक्षक नेमिलें. त्याप्रमाणें ते जमखिंडीस जाऊन रुजू झाले. तेथें आपलें

काम ते फार उत्तम रीतीने बजावीत होते परंतु त्यांचें व आ- पासाहेबांचें न बनल्यामुळें त्यांनीं ती जागा सोडून दिली व सन १८५१ सालीं मुंबईंत एल्फिन्स्टन विद्यालयांत दरमहा ४० रुपये पगाराची शिक्षकाची जागा पत्करिली. या वि- द्यालयांत येऊन फार दिवस झाले नाहींत तोंच ह्मणजे सन १८५२ त त्यांस मुंबईंतील सेक्रेटरीएट कचेरीमध्यें रेव्हिन्यू खात्यांत दरमहा ६० रुपये पगाराची जागा मि- ळाली. या कचेरींत असतां व त्याचप्रमाणें जमाखिंडी येथें व एल्फिन्स्टन विद्यालयांत असतांना यांच्या सौजन्याची व मनमिळाऊपणाची माहिती त्यांच्याशीं ज्यांचा संबंध येई त्यांस झाली होती. लहानपणापासून किती दरिद्रावस्थेमध्यें आपलें आयुष्य गेलें व आपल्या वडीलांस त्यविषीं किती संकटानें दिवस काढावे लागले यांचें **भास्करराबजींस** वि- स्मरण होत नसे. आपले वडील आतां वृद्ध झाले. पूर्वीं आपल्याहातून त्यांची व्हावी तशी सेवा झाली नाहीं हें मनांत येऊन त्यांस किंचितही दुःख न होईल अशी तजवीज भास्करराबजींनीं ठेविली. **दामोदरभटजींसही** आपल्या एकुलत्या एक मुलास चाकरी मिळून आपला प्रपंच आतां बऱ्याच सुखानें चालला आहे हें पाहून आनंद होत असे. त्यांस वाटे कीं, आजपर्यंत विद्याभ्यासांत मुलाचें जें आयुष्य गेलें त्याचें सार्थक्य झालें. वाचकहो, ज्या मनुष्यास **दुर्दैवानें** आपलें बहुतेक आयुष्य

गरिबीमध्यें घालवावें लागलें असेल, त्यांच्या वृद्धापकाळीं त्यांची ती गरिबी त्यांच्या मुलांच्या विद्वत्तेनें व शहाणपणानें दूर झाल्यामुळें त्यांचा अंतकाल किती सुखानें जाईल व त्यास किती आनंद होईल बरें! त्याचप्रमाणें **दामोदर** भटजींस जो आनंद होत असे त्याची कल्पना आपणच करावी; कारण त्या आनंदाचें वर्णन करणें अशक्य आहे. असो, **भास्करराव** आपल्या लहानशा कुटुंबामध्यें अशा रीतीनें पितृसेवेंत आनंदानें काळ घालवीत असतां त्यांजवर एकाएकीं संकट कोसळलें, तेणेंकरून त्यांस अनिवार्य दुःख झालें. आपल्यास नोकरी मिळून फार दिवस झाले नाहींत यामुळें आपल्या कुटुंबास थोडा बहुत सुखाचा अनुभव फार दिवस मिळाला नाहीं. आपल्या वडिलांचें बहुतेक सर्व आयुष्य दुःखामध्यें व काळजीमध्यें गेलें. आतां वृद्धापकाळीं तरी त्यांस सुखानुभव फार दिवस होईल, व त्यांस कोणत्याही गोष्टीपासून दुःख न होईल अशी तजवीज आपण सतत ठेवूं अशी जी **भास्कररावजींची** मनापासून इच्छा तिचा त्यांचे वडील **स्वर्गस्थ** झाल्यानें अगदीं भंग झाला. पितृमरणाचें दुःख कोणासही होत नाहीं असें नाहीं. तें सर्वांस होतें व व्हावयाचेंच व त्याप्रमाणें किंबहुना ज्यास्त **भास्कररावजींस** झालें. आपल्या हातून होईल तितकी तजवीज करून पित्यास सुख देणें हा जो पुत्रधर्म तो वडील स्वर्गस्थ झाल्यानें आपल्या हातून फार दिवस चालला नाहीं,

यामुळें **भास्कररावजींस** अतिशय दुःख झालें. आजपर्यंत प्रपंच संबंधीं त्यांस किंचित्‌ही काळजी नव्हती. मातोश्री लहानपणींच स्वर्गस्थ झाली होती, परंतु सापत्न माता व पिता यांचें **भास्कररावजींवर** अत्यंत प्रेम असे, यामुळें मातोश्री विरह दुःख **भास्कररावजींस** होत नसे. आतां आपण एकटे राहिलों. असो, परमेश्वरावर भरंवसा ठेवून आल्या प्रसंगास सादर असावें हें योग्य असें समजून ते स्वस्थ राहिले.

सेक्रेटरीयट कचेरींत **भास्कररावजींचा** पगार ६० रुपयांपासून ११० रुपयेपर्यंत वाढला. त्या कचेरींतील सर्व मोठमोठाल्या युरोपियन व एतद्देशीय कामगारांची त्यांजवर पूर्ण कृपा असे. **भास्कररावजींस** आपला पगार वाढला यामुळें गर्व न होतां त्या कचेरींतील सर्व मंडळी बरोबर मोठ्या स्नेहभावानें ते वागत असत. यामुळें त्या कचेरींतील वरिष्ट व कनिष्ठ अम्मलदार व कारकून या सर्वांस ते फार आवडत असत. कालेजांतील परीक्षा उतरली यामुळें आपली विद्या पूर्ण झाली असें कधींच ते समजत नसत. त्यांस चाकरी मिळाल्या दिवसापासून त्यांनीं संस्कृत भाषेचा अभ्यास चालविला. त्यास जो रिकामा वेळ मिळत असे त्यामध्यें ते इंग्लिश भाषेंतील निरानिराळ्या विषयांवरील ग्रंथ वाचीत असत. यामुळें त्यांच्या भेटीस कोणी गेलें असतां ते कधीं रिकामे आहेत असें कोणासही आढ-

ळत नसे. **भास्करराव** विद्वान असून आपल्या देशबांधवांमध्यें विद्येचा प्रसार करण्याविषयीं मोठे मेहनत करणारे आहेत असें कित्येक गोष्टींवरून सर्वांस माहीत होतें. यामुळें ह्या इलाख्यांतील शाळा खात्यांत त्यांस १८५९ सालीं दरमहा १५० रुपये पगारावर खानदेश व नगर या जिल्ह्याचे व्हिजिटर नेमिलें. या हुद्यावर ते सुमारें एक वर्ष होते. या थोड्या अवकाशांत हे मोठे विद्वान्, सज्जन व परोपकारी आहेत अशी त्यांची ह्या जिल्ह्यांत प्रशंसा झाली. इतक्यांत शाळा खात्यांतील ट्रान्सलेटर मे० मेजर क्यांडीसाहेब विलायतेस रजा घेऊन गेले. त्यांच्या जागेवर रावसाहेब **भास्कर**-रावजींची नेमणूक झाली. क्यांडीसाहेब परत आल्यावर रावसाहेब पाळंदे आपल्या व्हिजिटरच्या जागेवर परत गेले. पुढें पुण्यांतील नारमल स्कुलावर त्यांस सुपरिन्टेंडेंट नेमिलें. या हुद्यावर कांहीं दिवस राहिल्या नंतर त्यांस मुंबईस सरकारी बुक डिपोचे क्युरेटर नेमिलें. त्या वेळीं त्यांस दरमहा २०० रुपये पगार मिळत असे.

या प्रमाणें रावसाहेब भास्कररावजींची सरकारच्या चाकरींत मोठी बढती होत चालली. त्या वेळीं मेहेरबान कौपर या नांवाचे साहेब इनाम कमिशनर होते. त्यांजपाशीं विद्वानांची मोठी चहा असे. भास्करराव मोठे विद्वान असें जाणून त्यांणीं त्यांस आपल्या कचेरींत दरमहा ३०० रुपये पगाराची जागा दिली. भास्कररावजी आपलें काम मोठ्या

प्रामाणिकपणानें व हुशारीनें चालवीत असत म्हणून कौपर साहेब यांची त्यांजवर मोठी कृपा असे. पुढें या इलाख्यांतील दक्षिणभागचे रेव्हिन्यु कमिशनर मेहेरबान हार्टसाहेब यांणीं भास्कररावास आपल्या असिस्टंट कमिशनरची दरमहा ४०० रुपये पगाराची जागा दिली. या जागेवर असतांही रावसाहेबांनीं आपली विद्वता प्रामाणिकपणा व काम करण्याची शैली या अलौकिक गुणांनीं मेहेरबान हार्ट साहेब यांची प्रीति संपादन केली. याच सुमारास रावबहादुरास मेहेरबान कर्नल ए थिरीज साहेब सेटलमेन्ट आफिसर यांच्या जागेवर कांहीं दिवस नेमिले होते. पुढें अहमदनगर येथें दरमहा ७०० रुपये पगाराची स्मॉल कॉज कोर्टाच्या जजाची (न्यायाधिशाची) जागा त्यास मिळाली. सन १८६९ सालीं रावबहादूरास पुण्यास फर्स्ट क्लास सबॉर्डिनेट जज्जाच्या जागेवर नेमिलें. त्या वेळीं त्यांस दरमहा ८०० रुपये पगार मिळत असे. पुढें कांहीं दिवस त्यांस पुण्यांतील स्मॉलकॉज कोर्टाचे अॅक्टिंग जज्जाची जागा मिळाली होती. नंतर मुंबईतील स्मॉलकॉज कोर्टांत ४ थ्या जज्जाची जागा रिकामी झाली तिजवर त्यांची नेमणूक झाली. या जागेवर असतां त्यांस दरमहा १००० रुपये पगार मिळत असे. याच कोर्टांत तिसरे जज्जाची १२५० रुपये पगाराची जागा रिकामी होतांच ती रावबहादुरास मिळाली. हें मोठें हुद्याचें काम चालवीत असतां आजारी पडून त्यांनीं सहा महिन्याची रजा घेतली. परंतु ती पुरी

होण्याच्या पूर्वीच ह्या जगेचा व सर्व ऐहिक सुखाचा त्याग करून ते पुण्यांत ता० १८ दिसेंबर १८७४ रोजीं पहाटेस एक वाजतां स्वर्गस्थ झाले.

---

## भाग ४.

ज्यास जी वस्तु प्रिय त्यास ती साध्य करून घेण्यास प्रयत्न करण्यास सांगण्याची गरज नाहीं. त्याच प्रमाणें ती साध्य करून घेण्यास अनेक प्रकारच्या अडचणी उत्पन्न होत असतील तर त्यांचे निवारण कसें करावें हेंही त्यास सुचविण्याची जरूरी नाहीं. हरप्रयत्न करून मनांतील हेतु पूर्ण करावा असा वहुत करून मनुष्य मात्राचा नियम आहे. तशांत प्रयत्न करणारा ज्ञानी, विद्वान् व विचारी असेल तर त्याचे सर्व हेतु सिद्धीस जावयाचेच. त्या प्रमाणे रावबहादूर **भास्करराव** पाळंदे ह्यांची प्रकृती अशक्त असतां व नेहमीं कोणत्या तरी विकृती पासून त्यांस बाधा होत असतां त्यांनीं आपला ज्ञान प्राप्त करून घेण्याचा हेतु सिद्धीस नेला असें ते जरी स्वतः कधीं म्हणत नव्हते व याचमुळें अंतकाळ समीप येई पर्यंत त्यांचा अभ्यास सतत चालला होता, तथापि ते ज्यांस उत्तम माहीत होते तेच नव्हत परंतु ज्यांणीं ज्यांणीं त्यांचे ग्रंथांचें अवलोकन केलें व त्याचें भाषण श्रवण केलें ते सर्व त्यांस उत्तम विद्वान् असें मानीत.

त्यांस प्रथम चाकरी मिळाली या वर्षापासून त्यांनीं संस्कृत भाषेचा अभ्यास पुनः सुरू केला. हें मागें सांगितलेंच आहे. लहानपणीं थोडाबहुत त्या भाषेचा अभ्यास केला होता खरा परंतु तो फार झालेला नव्हता. त्यांच्या वेळीं मराठी भाषेंत निरनिराळ्या अनेक विषयावर हल्लीं प्रमाणें अनेक ग्रंथ नव्हते. यामुळें नेहमीं इंग्लिश ग्रंथ वाचून त्यांतील उपयुक्त माहिती आपल्या देशबांधवांस कळविण्याची त्यांस मोठी हौस असे. त्या वेळीं मुंबईंत "ज्ञानप्रसारक" या नांवाची एक मंडळी असे. त्या मंडळी पुढें त्या वेळच्या बहुतेक सर्व मोठमोठ्या विद्वान गृहस्थांनीं निरनिराळ्या उपयुक्त विषयांवर निबंध वाचले होते हें सर्वांस माहीत आहेच. अशा मंडळीपुढें रावबहादूर भास्करराव पाळंदे यांनींही अनेक वेळां निबंध वाचले. ज्ञानप्रसारक मंडळी पुढें वाचलेले सर्व निबंध छापून पुस्तकरूपानें त्यावेळीं दरमहा प्रसिद्ध होत असत. यामुळें ते सर्वत्रांच्या अवलोकनांत आलेच असतील. त्या निबंधाच्या पुस्तकामध्यें निबंध कर्त्याचें नांव व त्यानें ज्या विषयावर निबंध लिहिला असेल त्या विषयाचे नांव लिहिलेलें आहे. यासाठीं भास्कररावजींनी त्या मंडळीपुढें कोणते निबंध वाचले होते या विषयीं येथें उल्लेख करण्याची अवश्यकता दिसत नाहीं. व कदाचित् त्या विषयीं येथें साद्यंत माहिती देण्याचा विचार केलाच तर ते निबंध वाचकां करितां येथें साद्यंत उतरून घेतले पाहिजेत. परंतु असें केल्यानें या

पुस्तकाचा विस्तार फार मोठा होईल यास्तव त्या मंडळीच्या पुस्तकांतून **भास्कररावजींचे** निबंध वाचकांनी अवश्य वाचावे अशी त्यांस आम्ही मोठ्या प्रेमभावानें सूचना करितों.

सन १८५१ सालीं "लंडन शहरीं हिंदुलोका करितां धर्मशाळा बांधण्या पासून नफे" या विषयावर उत्तम निबंध लिहिणारास सर अरस्कीन पेरी यांचे नांवाचें एक पदक बक्षीस मिळावयाचें होतें. या विषयावर **भास्कररावजींनीं** एक अत्युत्तम निबंध लिहिला व तें बक्षीस त्यांसच मिळालें. हा निबंध भास्कररावजींनीं कॉलेजांतील अभ्यास सन १८५० सालीं पुरा करून लवकरच पुढें सुमारें एक वर्षानें लिहिला, ह्या वरून त्या वेळीं उंच प्रतीची विद्या प्राप्त करून घेण्यास अडचणी असतां त्यांनीं विद्या कशी संपादित केली होती हें सहज लक्षांत येईल.

ज्ञानप्रसारक मंडळीपुढें त्यांनीं जे निबंध वाचले ते या निबंधा नंतर वाचले. हे निबंध ज्या अर्थीं **भास्कररावा** सारिख्या सतत विद्याभ्यासांत निमग्न असणाऱ्या पुरुषानें अनेक ग्रंथावलोकन करून लिहिले त्या अर्थीं ते अर्थातच उत्तम असले पाहिजेत.

**भास्कररावजींचा** संस्कृत भाषेचा अभ्यास जसजसा अधिक होत चालला तसतशी त्यांची मराठी भाषा प्रौढ व प्रगल्भ लिहिण्याची शैली वाढत चालली. त्याचप्रमाणें त्यांस सभेंत भाषण करण्याची चांगले प्रकारें माहिती होती, व

त्यांत परिश्रम केल्यामुळें त्यांनीं ज्या ज्या सभेंत भाषण केलें त्या त्या सभेंतील श्रोत्यांस आनंद झाल्या वांचून राहिला नाहीं. "ज्ञानप्रसारक" मंडळी पुढेंच **भास्कररावजींनीं** निबंध वाचले असें नाहीं. मुंबईंत "स्टुडंट्स साइंटिफिक् ऍन्ड लिटररी सोसायटी" या नांवाची मंडळी आहे, त्या मंडळी पुढेंही अनेक विषयांवर त्यांनीं निबंध वाचले. त्यांनीं विक्रमोर्वशी या संस्कृत भाषेंतील नाटकाचें मराठी सुरस गद्यपद्यात्मक भाषांतर केलें. पद्यरचना या नांवाचें जें पुस्तक प्रसिद्ध आहे त्याचे कर्ते तेच होत.

विद्याखात्यांत अलीकडे पाहिलें, दुसरें, तिसरें अशीं जीं मराठी पुस्तकें चालतात त्यांतील पाहिलें पुस्तक **भास्कररावजीं**-नीं केलें. ते ऑफिशिएटिंग मराठी ट्रान्सलेटर असतां त्यांनीं रा. रा. परशुरामपंत तात्या गोडबोले यांणीं "नवनीत" या नांवाचा एक ग्रंथ केला आहे, त्या ग्रंथाला पद्यरचना व कवींचें वर्णन हे दोन निबंध जोडले आहेत.

**भास्कररात्र** अहमदनगर येथें असतां त्यांनीं "रत्नमाला" या नांवाचा एक ग्रंथ रचिला. मुंबईंत प्रार्थना समाजाची स्थापना झाल्यावर प्रति आठवड्यास तेथें उपासना होत असते; त्या प्रसंगीं रत्नमालेंतील कविता त्या समाजांत गात असत. भास्करावजींनीं शेवटला ग्रंथ केला तो "गीतासुधा" हा होय. त्यांनीं केलेल्या एकंदर पुस्तकांत हे दोन ग्रंथ मोठे प्रख्यात आहेत. आपल्या देशांत विद्येचा प्रसार फार नाहीं.

यासाठीं आपल्या हातून तिचा प्रसार करण्याचें काम सिद्धीस जाईल असें जरी त्यांस वाटत नव्हतें, तथापि त्या उद्देशानें आपण प्रयत्न करणें हें आपलें कर्तव्य समजून ते सतत झटत असत. आपल्या देशांतील स्त्रियांनीं विद्याभ्यास केल्या शिवाय वरील हेतु पूर्णपणें सिद्धीस जावयाचा नाहीं, असें कितीएक सुज्ञ विद्वानांचे मनांत येऊन त्यांणीं स्त्री शिक्षणाच्या शाळा स्थापण्याचा प्रयत्न केला. हा सदुद्योग करणारां पैकीं **भास्करराव** हे एक होते. व मुंबईंत मुलींच्या शाळा स्थापण्यास पुष्कळ अंशीं तेच कारणीभूत झाले असें म्हणण्यास हरकत नाहीं.

आपल्या देशाची व आपल्या देशबांधवांची सुधारणा व्हावी एतदर्थ ज्या ज्या मंडळ्या स्थापन झाल्या त्यांत भास्करराव नाहींत असें विरळा आढळेल. असल्या कृत्यास केवळ शरीरद्वारें ते मदत करीत होते असें नाहीं तर द्रव्यानेंही मदत करीत असत. आंधळे व पांगळे लोकाकरितां पुण्यांत जी धर्मशाळा आहे ती स्थापण्याचे कामीं **भास्कररावांनीं** फार परिश्रम केले व तिची स्थापना करण्यास तेच कारणी भूत झाले असें म्हणतात. अलीकडे ६-७ वर्षांत त्यांची प्रकृति फारच बिघडली होती परंतु स्वदेश हिताविषयीं कोठेंही विचार होत असला तरी आपलीं इतर सर्व कामें एकीकडे ठेवून अशा ठिकाणीं ते जात असत. बराचवेळ भाषणकरणें त्यांच्या प्रकृतीच्या मानाप्रमाणें त्यांस जरा अपकार-

क होत असे खरें परंतु प्रसंग आला म्हणजे त्याप्रसंगास व विषयास अनुलक्षून ते फार सुरस भाषण करीत. "उपर्युक्त ज्ञानप्रसारक" मंडळीच्या संबंधें ते दरवर्षास निदान एकतरी व्याख्यान देत गेले. ते या मंडळीचे अध्यक्ष व स्टुडंट्स लिटररी ऍन्डसायंटिफिक असोसिएशन्सचे उपाध्यक्ष व युनिवार्सिटीचे फेलो होते. ह्याप्रमाणें देशहिताच्या सर्व कामांत **भास्कररावाची** पूर्ण मदत असे. अगदीं गरीब स्थितीपासून उंच स्थितीस ते स्वतः आपल्या कुशाग्र बुद्धिसामर्थ्यानें पोंहोंचले होते. यामुळें दारिद्री व दुःखी लोकांची स्थिती कशी असते, त्याजवर नाना प्रकारचीं संकटें उत्पन्न झालीं असतां त्यांचें निवारण न झाल्यामुळें अथवा तीं निवारितां न आल्यामुळें त्यांच्या मनाची कशी स्थिति होते, गरीब विद्यार्थ्यांस द्रव्याचें साह्य नसल्यामुळें त्यांच्या विद्याभ्यासास केवढी दुर्धर अडचण उत्पन्न होते; हें सर्व ते जाणत होते. ह्या मुळें दुःखिताचें दुःखापासून विमोचन करणें, एखाद्या गरीब मनुष्यास आपल्या सामर्थ्यां प्रमाणें मदत करणें, संकटांत पडलेल्या मनुष्यास त्यांतून पार पाडण्यास कांहीं युक्तीच्या गोष्टी सांगणें, गरीब विद्यर्थ्यांस विद्या करितां येईल अशी त्यांची तजवीज करणें, ह्या गोष्टी प्रत्येक मनुष्यास उचित असें जाणून ते मोठ्या आनंदानें करीत असत.

**भास्कररावांचा** जन्म श्रीमंत घराण्यांत नव्हता व ते अति श्रीमान झाले होते असें ही नाहीं तथापि अहंमदनगर येथें

असतां तेथील एका देवालयाचा सभामंडप बांधण्या करितां त्यांणीं ५०० रुपये दिले. ते गाहायात्रेस गेले होते तेथें त्यांणीं एकसहस्र रुपये धर्मार्थ दिले,व ५०० रुपयांचें वर्षास जें व्याज येईल तें धर्मार्थ खर्चावें असें ह्यांनीं आपल्या मृत्यु पत्रांत लिहून ठेविलें आहे. ह्यावरून व याचप्रमाणें ते दररोज याचकांस जो किरकोळ धर्म करित असत त्यावरून गरीबांकडें त्यांचें किती लक्ष होतें हें उघड दिसून येतें.

**भास्करराव** आपल्या वयांत आल्यावर धर्म संबंधीं त्यांचीं मतें कशीं होतीं याविषयीं बरोबर कांहींच सांगतां येत नाहीं. परंतु आलीकडे सुमारें १० वर्षें ते आपला सर्व वेळ वेदांत विषयाचा विचार करण्यांत घालवीत असत. या कालामध्यें अहोरात्र भगवत गीतेचें पठण करणें, व सर्व शक्तिमान् जो प्रभु त्याचें निरंतर भजन करणें, व नाशवंत सुखाकडे फारसें लक्ष न देतां शाश्वत सुख प्राप्तकरून घेण्याचे जे मार्ग त्यांचें अवलंबन करणें, यांत ते निमग्न असत. त्यांस भगवत् गिता मुखोद्गत येत होती. वेदांत विषयामध्यें जरी ते निमग्न झाले होते, तथापि त्यांनीं कर्ममार्ग सोडला नव्हता. **भास्कर** रावांची मातोश्री ते अल्पवयांत असतांच वारली, व त्यांचा विद्याभ्यास पुरा होऊन त्यांस चाकरी मिळाल्यावर थोडेच काळानें त्यांचे वडील परलोकवासी झाले, एवढीच अकालिक दुःखें त्यांजवर आलीं असें नाहीं, त्यांची पहिली पत्नी निवर्तल्यावर त्यांनीं दुसरें लग्न केलें परंतु तिचेंही वास्तव्य या जगांत

फार दिवस झालें नाहीं. शेवटीं त्यांनीं तिसरें लग्न केलें, हें शेवटचें लग्न होऊन फार वर्षें झालीं नाहींत तों आपण स्वर्गस्थ झाले. हर हर जगदीश्वरा हा केवढा त्यांच्या शेवटच्या अल्पवयस्क पत्नीवर अनर्थ बरें!! असो,तुझी करणी अगाध आहे, आम्हां मानवांस त्यां विषयीं ज्ञान होणें कठीण असें म्हणून आह्मांस केवळ स्वस्थ बसणें भाग आहे. भास्कररावांस प्रथम पत्नी पासून एक कन्या व दुसरी पासून एक मुलगा सुमारें तेरा वर्षांचा हीं काय तीं आपत्यें आहेत. भास्कररावांचा स्वभाव मोठा मन मिळाऊ असे, यामुळें त्यांचें कोणाशीं वैमनस्य नसे. त्यांस कोणी भेटावयास गेलें असतां त्यांच्या योग्यते प्रमाणें त्यांचा बहुमान ठेवून त्यांज पाशीं मोठ्या प्रेमानें ते भाषण करीत असत. मनुष्य मात्रास या जगांत जीं नाना प्रकारचीं संकटें सहन करावीं लागतात तीं टाळण्यास, व एकमेकांस आपल्या सुख दुःखाच्या गोष्टी सांगून दुःखांतच सुख मानून घेण्यास कांहीं उत्तम मित्रांची अवश्यकता लागते. ज्यास मित्र नाहींत असा मनुष्य आढळणें विरळा. राव साहेब नारायण भाई दांडेकर पुना ट्रेनिंग कालेजचे माजी प्रिन्सिपाल ह्यांचा व भास्कर रावांचा लहानपणा पासून फार स्नेह होता. हे व रा०रा० दाजी निळकंठ नगरकर पुना सिविल इंजिनियरींग कालेजांतील प्रोफेसर ह्या उभयतां शिवाय दुसरें कोणी त्यांचे जिवलग मित्र नव्हते. भास्कररावांस वडिलोपार्जित सांगण्या सारखी जिनगी कांहीं एक मिळाली

नव्हती. परंतु त्यांनीं स्वपराक्रमानें पुण्यांत दोन तीन घरें संपादून कांहीं शेतें व एक बाग अशी इस्टेट केली. त्यांचा एकुलता एक पुत्र लहान या साठीं आपल्या सर्व इस्टेटीची व्यवस्था करणें व मुलास सज्ञान करणें इत्यादि कामें त्यांनीं रावसाहेब नारायण भाई दांडेकर व रा० रा० दाजीसाहेब न- गरकर यांजकडे आपल्या अंतकाळीं सोंपविलीं. या गृहस्थां- स भास्कररावांचे वियोगानें जरी अत्यंत दुःख झालें आहे त- थापि त्यांच्या कुटुंबांतील मनुष्यांस जेणें करून सुख प्राप्त हो- ईल व त्यांच्या मुलाचा उत्तम विद्याभ्यास होईल या गोष्टींकडे त्यांचें सतत लक्ष लागलें आहे.

---

## भाग ५.

प्रिय वाचक हो, या आपल्या इलाख्यांत जे नामांकित मोठ मोठाले विद्वान् व परोपकारी गृहस्थ होऊन गेले त्यां पैकींच राव बाहादूर भास्करराव हे एक होते. त्यांचें संक्षिप्त चरित्र वाचून मनास साल्हदाश्चर्य वाटल्या शिवाय राहील असा मनुष्य आढळणें विरळा. ते लहान असतां त्यांची स्थिति कशी होती व अंतकाळीं ते केवढ्या योग्यतेस आले होते हें मनांत आल्यावर तर विलक्षणच आश्चर्य वाटतें. या- संक्षिप्त वर्णनाचा क्षणभर विचार केला ह्मणजे त्या पासून लक्षांत ठेवण्या सारख्या बहुत गोष्टी आढळतील. एकतर

आपल्या देशांत दारिद्र्याचें आगमन झालें आहे असे जे चोहें कडून उद्गार ऐकूं येतात त्याचें कारण समजून घेतलें असतां तें दूर करण्यास आपण काय केलें ह्मणजे समर्थ होऊं या विषयीं आपणा पुढें ढळढळीत अनुकरण करण्यासारखें ह्यांच्या चरित्रांत उत्तम उदाहरण सांपडतें. दुसरें, आपली प्रकृती अशक्त आहे, आपल्यास आतां या पुढें ज्यास्त अभ्यास होत नाहीं, अशी नाना प्रकारचीं कारणें सांगून जे किल्येक मोठे होतकरू विद्यार्थी अल्प वयांतच विद्याभ्यास करणें सोडून देऊन विद्येच्या अलभ्य लाभास मुकतात त्यांनीं आपल्या रावबाहदुरांच्या चरित्राकडे जरा लक्ष्य दिलें तर आपण आपला विद्याभ्यास व्यर्थ सोडून दिला ज्या कारणांस्तव आह्मीं विद्याभ्यास करणें सोडून दिलें तीं कारणें अयोग्य. आह्मींही परिश्रम केले असते तर आमच्या हातून कांहीं तरीं ज्यास्त विद्याभ्यास खचित झाला असता असें यांस वाटल्या वांचून राहाणार नाहीं. तिसरें, ज्या धन्याची आपण चाकरी करीतों त्याजपाशीं आपण आपलें वर्तन प्रामाणिक पणाचें ठेविलें असतां तो आपणास कधीही विसणार नाहीं. हें भास्कररावांची जी गेल्या सुमारे २५ वर्षांत बढती झाली त्या वरून उघड दिसून येतें. भास्करराव- जमखिंडीहून परत आल्यावर त्यांनीं ४० रुपये दरमाहाची चाकरी पत्करिली. व हळू हळू वरील मुदतींत त्यांचा पगार पंचवीस पट वाढला. केवळ त्यांचा पगारच वाढला असें

नाहीं, परंतु सरकारास त्यांची मोठी प्रतिष्ठा असे. मेहरबान हार्ट, कौपर, हावर्ड, अरस्कीन, व ऑनरेबल एलीस टकर व गिब्स अशा मोठमोठ्या सरकारी कामदारांची त्यांजवर मोठी कृपा असे. कोणीही सरकारी चाकरी करणारा मनुष्य विद्वान्, प्रमाणिक व सरकारी काम झटून करणारा असा असल्या शिवाय त्याजवर त्यांच्या वरिष्ठांची कृपा होणे अशक्य. चौथें, आपण काय लक्षाधीश आहों आपल्या देश बांधवांच्या उपयोगी आपण ते काय पडणार? आमच्या पेक्षां दुसरे मोठ मोठाले लोक पुष्कळ आहेत. अशा लोकांनीं आपल्या देशाचें अगर आपल्या लोकांचें कल्याण करण्याचा विचार केलातर त्यांच्या हातून तें काम बऱ्याच अंशीं सिद्धीस तरी जाईल असे म्हणून जें काय होत आहे तें पाहात बसणारे जे असतील त्यांस प्रयत्न केला असतां आपल्या हातूनही आपल्या देशाचें थोडें तरी कल्याण होईल असें **भास्करराव**ांच्या चरित्रावरून मनांत आल्याविना राहणार नाहीं.मुंबईतील स्त्रीशिक्षण, ज्ञान प्रसारक मंडळी, पुण्यातील भिक्षा गृह हीं सर्व कामें भास्कररावां सारखे सद् गृहस्थ पुढें सरसावले नसतें तर घडून आलीं नसतीं. अथवा घडून आलीं असतीं तरी तीं केव्हांच लयास गेली असती. रावबाहादुरांचें चारित्र वाचल्यानें या सर्वांपेक्षां दुसरी एक फार महत्वाची व पुर्णपणें लक्षांत ठेवण्या सारखी गोष्ट आढळतें. तीही कीं उदरनिर्वाहा करितां विद्या संपादन नकरीतां, विद्या

संपादन करणें हेंच मनुष्यास भुषण असें समजून ती संपादन करावी. जरी सर्व नाहींत तथापी बहूतेक जे सांप्रत विद्या संपादन करीत आहेत अथवा ज्यांणीं थोडी बहूत संपादन केली आहे ते सर्व विद्या संपादन केल्या शिवाय आपला उदरनिर्वाह होणें कठिण पडेल तें नपडावें ह्या किंवा या सारख्याचउद्देशानें ती संपादित आहेत, अथवा त्यांणी तीं संपादिली असावी असें म्हणण्यास चिंता नाहीं. प्रिय वाचकहो हा दोष व्यर्थ सर्वांस लावावा या उद्देशानें आह्मीं असे म्हणतों असें समजूनये.हेच बहूतेक लोकांचे विचार आहेत असे आपण अनेक वेळा प्रसिद्ध सभेमध्यें हीं ऐकिलें असावें. विद्या संपादन करणें हें आपलें कर्तव्य समजून ती जे संपादण्याचा प्रयत्न करूं लागतात ते एकवार कांहीं मर्यादे पर्यंत म्ह० विद्याभ्यास झाला पुढें व्यासंग करणें सोडून न देतां तो तसाच सुरूं ठेवितात. अहो रात्र जो अवकाश मिळेल तो व्यर्थ निरूपयोगी कामामध्यें न घालवितां आभ्यसांत घालवणें हेंच त्यांस मोठें भूषण वाटतें. अशा प्रकारें जे विद्याभ्यास करितात त्यांसच खरे विद्वान् हें नांव भूषणाई होईल. व अशाच विद्वानांचे हातून या अभाग्य देशाचें कल्याण होईल. अशा प्रकारचे विद्वान् फारच थोडे आढळतील याचा अनुभव सर्वांस आहेच- **भास्करराव** हे आलीकडे बहुत करून नेहमीं आजारीच असत; परंतु त्यांचा अंतकाळ समीप येई पर्यंत त्यांणीं आपला व्यासंग सोडला नव्हता.

**भास्कररावास** आपणसर्व प्रकारच्या सुधारणा करण्यांत आहों असें प्रसिद्ध करणें फारसें आवडत नसे. याचमुळें ते स्त्री पुनर्विवाह करणें, बालविवाह निषेध करणें, इत्यादि देश हिताच्या कामांत नसावेत व त्यांस ह्या सर्व गोष्टी आवडत नव्हत्या असेंही कदाचित् कोणास वाटेल परंतु वास्तविक प्रकार असा आहे कीं,त्यांस या सर्व गोष्टी सिद्धीस जाव्या असें मनापासून वाटत असे. एवढेंच नाहीं परंतु अशा कामीं त्यांच्या कडून जेवढी मदत देववेल तेवढी ते देत असत. परंतु आपल्या देशांत विद्येचा प्रसार फार न झाल्या मुळें लोकांच्या जुन्या समजुतींत फारसा फेर फार झाला नव्हता या साठीं तूर्तच त्या सर्वांच्या विरुद्ध आपल्यास एकदम जातां येत नाहीं असें समजून ते त्या प्रमाणें वागत असत.

**भास्कररावजींनीं** ज्या प्रमाणें अभ्यास केला; त्यांस चाकरी मिळाल्यावर ज्या प्रमाणें त्यांनीं आपला विद्याभ्यासाचा क्रम सोडिला नाहीं, सुमारें १५ वर्षां पूर्वीं स्त्री शिक्षणा सारख्या कामाची सुरवात करणें फार कठिण असतां सतत प्रयत्न करून जशी त्यांनीं तीं कामें सुरू करविलीं; आपल्यास जें ज्ञान प्राप्त झालें त्याचा लाभ पुस्तक रूपानें अथवा निबंधाच्या अथवा व्याख्यानाच्या रूपानें आपल्या देश बांधवांस होण्या करितां जसे त्यांनीं प्रयत्न केले; खरी विद्या संपादन केल्यामुळें भास्कररावांच्या आचरणांत व मनोवृत्तींत जसा फेरफार झाला होता, व यामुळें लोक त्यांची जशी प्रशंसा करीत होते,व त्यांस जसा

मान देत होते त्या प्रमाणें आपल्या देशांतील सर्व नाहींत तर नाहींत परंतु बरेच लोक जर वागूं लागतील व सर्व लोकांस प्रिय होतील तर आज जीं बहुतेक सुधारणेची कामें आपल्या अनास्थेनें पडून राहिलीं आहेत त्यांचा उर्जितकाल आल्या शिवाय राहणार नाहीं. पंचवीस वर्षां पुर्वीं **भास्कररावास** अशा स्तुत्य देश हिताच्या कार्यासही विघ्नें आणणारे लोक होते. परंतु दिवसें दिवस विद्येचा प्रसार अधिकाधिक होऊं लागला आहे. यामुळें सर्व प्रकारच्या अडचणी हळू हळू दूर होऊं लागल्या आहेत. तेणें करून सुधारणा करण्यास हा काल जसा हितकारक आहे तसा पुर्वीं कधींही आलेला नव्हता. प्रिय देश बांधवहो, सरकारी मोठमोठालीं हुद्याचीं कामें करणारे एतद्देशीय लोक बहुत आहेत परंतु त्या सर्वांची पुर्वींची स्थिति **भास्कररावां** प्रमाणें होती असें नाहीं. ते जे एवढ्या मोठ्या हुद्याच्या जाग्यावर गेले होते ते केवळ स्वपराक्रमानें गेले होते. त्यांचे व त्यांच्या सारख्या दुसऱ्या परोपकारी गृहस्थांचें उदाहरण लक्षांत ठेवून त्या प्रमाणें वर्तन ठेविल्यास दयाळू इंग्रज सरकारच्या राज्यांत आपल्यास आपलें हित करून घेण्याचें सामर्थ्य येईल. विद्याभ्यास करून आपला उदर निर्वाह कसा होतो या विवंचनेत पडलेल्या लोकांस एकदां कोठें चाकरी मिळाली म्हणजे आनंद होणें हें साहजिक आहे. परंतु तेणें करून या जगांतील आपलीं सर्व कर्तव्यें आपण केलीं, आतां आपणांस कांहीं कर्तव्य राहिलें नाहीं, असा जो कित्येकां-

चा समज असतो त्यामुळें मात्र आपलें फार अनहित होत-आहे. आपल्या देशांत सार्वजनिक उपयोगाचीं कोटिशः कामें व्हावयाचीं आहेत. आपल्या हिता कडे सर्वकाळ लक्ष्य दिलें असतां तीं कधीं तरी आपल्या हातून होतील असा संशयही मनांत आणावयास नको. या देशाचा उदय काल येण्यास ज्या ज्या सुधारणा अवश्य केल्या पाहिजेत त्या त्या करण्या कडे आमच्या पैकीं ज्या थोड्या बुद्धिवान् परोपकारी सद्गृहस्थांचें लक्ष्य लागलें आहे त्यापैकीं भास्करराव हे एक होते, आपल्या देश बांधवांची सुधारणा करण्याविषयीं ते फार झटत असत. प्रकृतीनें पराकाष्टेचे अशक्त व आलीकडील वयाच्या मानानें बरेंच वयातीत असे असतां चौथे भागांत सांगितल्या प्रमाणें बहुतेक सर्व सुधारणेच्छु मंडळयामध्यें अध्यक्ष, उपाध्यक्ष व सभासद या नात्यानें ते होते. या वरून सर्व लोकहितार्थ झटणें त्यांस किती प्रिय वाटत होतें याचें सहज अनुमान करितां येईल.

कित्येकांस सार्वजनिक कामें करण्याची मोठी हौस असते, परंतु नानाप्रकारच्या प्रापंचिक अडचणीं मुळें त्यांच्या हातून म्हणण्या सारखीं लोक हिताचीं कामें होत नाहींत याचें कारण वास्तविक पाहिलें असता सार्वजनिक कामां पेक्षां स्वहिताच्या कामाकडे विशेष लक्षठेवणें हेंच होय. स्वहिताची हेळसांड करून सर्व काल लोक हित करण्यामध्येंच घालवावा हा उत्तम पक्ष, परंतु तसें कोणाही मनुष्याच्या हातून होणें नाहीं. आ-

पल्या अमूल्य वेळापैकीं भास्कररावां प्रमाणें थोड थोडा वेळ अशा परोपकाराच्या कामांमध्यें जर आपण प्रत्येक घालवूं लागलों तर आपणांमध्यें कोणतीच न्यूनता राहणार नाहीं रा० बा० भास्करराव हे परहित करण्या विषयीं फार झटत असत यामुळें त्यांची जितकी स्तुती करावी तितकी थोडीच

भास्कररावांस चाकरी लगून फार दिवस गेले नाहींत तों त्यांची पत्नी स्वर्गस्थ झाली. पुढें त्यांनीं दुसरें लग्न केलें परंतु तीही स्त्री एक पुत्र मागें ठेवून मृत्यु पावली. शेवटीं तिसरें लग्न केलें. अशीं मोठीं दु:सह दु:खें त्यांनवर कोसाळलीं. त्यांची प्रकृति तर इतकी अशक्त झाली होती कीं आपणास कोणत्या वेळीं हें जग सोडून जावें लागेल याचा नेम नाहीं असें त्यांसही वाटत असे. अशा प्रकारें बाल्यावस्थेपासून अंतकाल पर्यंत दिसण्यांत सुखाचा परंतु बऱ्याच अंशीं दु:खाचा काळ घालवीत असतां सर्व प्रकारच्या सुधारणा करण्याकडे त्यांचें लक्ष्य असे.

अशा रीतीनें ज्यांणीं आपला काळ घालविला अशा आपल्या परोपकारी, विद्वान्, थोर, व सद् सद् विचारी भास्कररावांची जिकडे तिकडे प्रशंसा होणें हेंच उचित होय. सूज्ञ वाचक हो, अशा विद्वानाच्या हातून आपल्या देशाचें हित झालें नसावें काय? मागील संक्षिप्त हकीगती वरून या पुरुषाच्या हातून स्वदेश हिताचीं आणखीं बहुत कृत्यें झालीं नसतीं काय? सर्व कांहीं झालें असतें. परंतु ईश्वरी नियम कांहीं निराळे

ाहेत. रा० ब० भास्कररावांस सुमारें पांच सहा वर्षे क्षया. ी भावना झाली होती. यारोगापासून बरें व्हावें ह्मणून त्यां नीं दोन तीन वेळां आजारी पणाच्या दाखल्या वरून रजाही घेतली होती. औषधी उपचार तर नेहमीं सुरू होतेच. परंतु यांचा कांहीं एक उपयोग न होतां राव बहादुर आपल्या व. याच्या ४३ वे वर्षी स्वर्गस्थ झाले!!!

अशा त्यांच्या अकालीं मृत्यूनें त्यांच्या कुटुंबावर केवढा प्रसंग आला बरें! त्यांचा पुत्र तर लहान बारातेरा वर्षांचा, घरांत उ. भयतां पिता पुत्रांच्या सापत्न माता, प्रपंच चालविण्यासारखं दुसरें कोणी नाहीं, अशी त्या कुटुंबाची अगदीं परतंत्र स्थिति झाली आहे. असो ईश्वरी इच्छा. रावबहादुर भास्कररावांच्या वियोगानें आम्हां सर्व एतद्देशीय लोकांस झालेलें दुःख दूर क. रून आह्मांस त्यांचें विस्मरण पडेल असे त्यांच्या सारिखे परो. पकारी व विद्वान् गृहस्थ या आर्य भूमींवर उत्पन्न होऊन ते स्वदेश बांधव हित करण्यास झटतील तो सुदिन समजला पा. हिजे. रावबहादुरांचा एकुलता एक पुत्र आपल्या वडिलां प्र. माणेंच विद्वान् व कीर्त्तिमान् होऊन दीर्घायु होवो ही सर्वशक्ति- मान् जो जगन्नियंता त्याज पाशीं प्रार्थना करून हें चरित्रआह्मी पुरें कारितों.

समाप्त.